भायखळा जिल्हा कारागृह येथे टेहळणी मनोरे
बांधण्याबाबत.

महाराष्ट्र शासन,
गृह विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.

शासन निर्णय, क्रमांक- बीएलडी-१३९४/३[१००]पीआरएस-३,
दिनांक- २९ मार्च १९९५.

वाचा:- कारागृह, महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे
पत्र क्र. बीएलडी-२९९४/३२६६/क-३, दि. ११. ११. १९९४.

निर्णय :- भायखळा जिल्हा कारागृह येथे टेहळणी मनोरेचे बांधकाम करणे अत्यंत आवश्यक असल्याने सदर बांधकामास येणारा अंदाजित खर्च रु. १, ९३, १८६/-[रुपये एक लाख, त्र्याण्णव हजार एकशे श्याऐंशी फक्त] इतक्या खर्चास शासन या आदेशाव्दारे खालील अटिंवर प्रशासकीय मान्यता देत आहे.

१] प्रस्तावित कामास अर्थसंकल्पात उचित तरतूद केल्याखेरीज सदर कामास सुरुवात करु नये.

२] यापूर्वी प्रशासकीय मान्यता दिलेली कामे प्राथम्याने हाती घेऊन नंतरच प्रस्तावित काम हाती घ्यावे.

३] प्रस्तावित काम हे चालू वर्षी हाती घ्यावयाचे असल्यास नियोजन विभागाने दिनांक ५. १०. ९४ च्या आदेशान्वये लावलेल्या कपातीच्या अधीन राहून उर्वरित तरतुदीतून खर्च भागवावा.

२. प्रस्तावित बांधकामावरील खर्च "४०५९ सार्वजनिक बांधकामावरील भांडवली खर्च ०१ कार्यालयीन इमारती -२०१ बांधकाम पंचवार्षिक योजनांतर्गत योजना-तुरुंग " या लेखाशिर्षाखाली खर्ची **[illegible]** टाकण्यात यावा.

३. हा आदेश सार्वजनिक बांधकाम विभाग, नियोजन विभाग, व वित्त विभागाच्या सहमतीने अनुक्रमे अनौपचारिक संदर्भ क्र. २०२९/इमा-२, दि. २० डिसेंबर ९४, नियोजन विभाग क्र. ३११३/१४११, दिनांक १२ जानेवारी १९९५ व सीआर क्र. ४८/९५/व्यय-८, दिनांक २४ जानेवारी १९९५ तसेच वित्त विभाग , शासन निर्णय क्र. विअप्र-१०९२/प्र. क्र. ११३/ ९२ विनियम दि. १ जून १९९२ सोबतच्या विवरणपत्रातील अनुक्रमांक -४ महाराष्ट्र अर्थसंकल्प नियम पुस्तिकेतील परिच्छेद २७[२] मधील रकाना ६ मध्ये नमूद केलेल्या अटींचे अधीन राहून निर्गमित करण्यात येत आहेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

[श्री. प. सोनवणे]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन, गृह विभाग.

प्रति,

कारागृह महानिरीक्षक, महाराष्ट्र राज्य, पुणे-६

कारागृह उपमहानिरीक्षक [मुख्यालय] महाराष्ट्र राज्य, पुणे-६

कारागृह उपमहानिरीक्षक दक्षिण विभाग [illegible] भायखळा, मुंबई-८

अधिक्षक, भायखळा जिल्हा कारागृह, भायखळा, मुंबई-८

महालेखापाल महाराष्ट्र-१ [लेखा व अनुज्ञेयता], मुंबई.

महालेखापाल महाराष्ट्र-१, [लेखा परीक्षा]मुंबई.

अधिदान व लेखाअधिकारी, मुंबई.

निवासी लेखा अधिकारी, मुंबई.

सार्वजनिक बांधकाम विभाग /इमा-२/अर्थ-२.

नियोजन विभाग /१४११

वित्त विभाग/व्यय-८

निवड नस्ती.